# प्रेस नोट

**परीमंडळ २ पुणे शहर विभागातील बंडगार्डन पोलीस ठाण्याचे हद्दीतील सराईत गुन्हेगारास पोलीस आयुक्त,पुणे शहर व पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रा मधून दोन वर्षा (०२) करीता हद्दपार केलेबाबत**

दिनांक :- ०६/०५/२०१९

बंडगार्डन पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सराईत गुन्हेगार **इसम नामेः- सुलतान उर्फ टिप्या लतीफ शेख.वय २७ वर्षे.रा.जनसेवा तरुण मंडळाजवळ, शिर्के टेलर्स समोर, १३, ताडीवाला रोड, पुणे.** यास महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ५६ (१) (अ) (ब) प्रमाणे पोलीस उप आयुक्त परीमंडळ २, पुणे शहर यांचेकडील तडीपार आदेश क्रमांक २६/२०१९ दिनांक ०६/०५/२०१९ रोजी दोनवर्षा (०२) करीता पोलीस आयुक्त,पुणे शहर, पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे व पुणे जिल्हयाचे कार्यक्षेत्रामधून तडीपार करण्यात आले आहे. सदर इसम याचे विरुध्द खून ,खूनाचा प्रयत्न करणे, जबरीचोरी करणे, गंभीरदुखापत करणे, जखमी करणे, आदेशाचा भंग करणे, गैरकायदयाची मंडळी, जमविणे, हाताने मारहाण करुन शिवीगाळ करणे, सामाईक इरादा, दुखापत पोहोचविण्याच्या इराद्याने अंगावर धावून जाणे, नुकसान करणे, बेकायदेशिर जमावात सामील होणे,दंगा करणे, समान उदिष्ट साध्य करण्यासाठी बेकायदेशिर जमावात सामील होणे, या सदराखाली वरील प्रमाणे गुन्हे बंडगार्डन, पोलीस ठाणे येथे दाखल असून त्याची बंडगार्डन पोलीस ठाणे हद्दीमध्ये दहशत असल्याने त्यास **बच्चन सिंह, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ २,** पुणे शहर यांनी पोलीस आयुक्त,पुणे शहर, पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे व पुणे जिल्हयाचे कार्यक्षेत्रा मधून दोन वर्षे (०२) करीता तडीपार केले आहे.

नागरीकांना तडीपार इसम दिसून आल्यास नजीकच्या पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा.

६/५

**(बच्चन सिंह)**
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ २,
पुणे शहर